महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमी अभिलेख (म.राज्य), पुणे
दूसरा व तिसरा मजला, नवीन प्रशासकीय इमारत, विधान भवन समोर, कॅम्प, पुणे १
दूरध्वनी क्र. ०२०-२६१२६०७२ Email ID :dirmah.mah@nic.in

---

क्रमांक/ना.भू.१/ परिपत्रक / FIFO /२०२४/ क्रमांक २१२४ पुणे दिनांक - २२/०७/२०२४.

**विषय :- प्रथम आवक प्रथम निर्गति (FIFO)लागू करणेबाबत.**

**परिपत्रक**

दिनांक १ एप्रिल २०२१ पासून भूमि अभिलेख विभागामध्ये ePCIS प्रणाली लागू करणेत आलेली आहे. सर्व फेरफारांची प्रकरणे ही या प्रणालीद्वारेच हाताळण्यात येत आहेत. परंतु प्रलंबित प्रकरणांची संख्या तसेच सरासरी निकाली दिवस हे आज ही शासनाने ठरवुन दिलेल्या मानांकनापेक्षा जास्त आहेत. काही कार्यालयामध्ये प्रकरणे मोठया प्रमाणात प्रलंबित राहत असून क्रम डावलुन प्रकरणे निकाली करणेचे कार्यवाही सुरु असलेची बाब निदर्शनास आली आहे. कार्यालयामध्ये अर्ज करणा-या प्रत्येक व्यक्तीला त्याचे काम विहित मुदतीत करुन देणे ही आपली प्राथमिक जबाबदारी आहे. परंतु तिचे पालन होताना दिसुन येत नाही. त्यामुळे शासकीय कार्यालय म्हणून आपले कार्यप्रध्दतीबाबत जनतेमध्ये विश्वासार्हता निर्माण होत नाही, व पारदर्शकता राहत नाही. लोक कल्याणकारी राज्यामध्ये जनतेचे हित हे सर्वोपरी असलेने व अधुनिक युगा मध्ये गतीमान प्रशासनाचा फायदा जनतेला करुन देण्यासाठी शासन नेहमीच प्रयत्नशिल असते. त्याचाच एक भाग म्हणून विभागाने फेरफार प्रक्रीयेसाठी प्रथम आवक प्रथम निर्गति (FIFO)लागू करणेचा निर्णय घेतला आहे. जेणेकरुन सर्व सामान्य जनतेला सेवा देणे सुलभ होईल व कार्यपध्दतीमध्ये गुणवता पारदर्शकता व गतिमानता आणता येईल.

लागू करणेत आलेल्या प्रथम आवक प्रथम निर्गति (FIFO) प्रणालीमध्ये आवक जावक लिपीक, परिरक्षण भूमापक, नगर भूमापन अधिकारी/उप अधीक्षक भूमि अभिलेख यांचा समावेश करणेत आलेला आहे. फेरफाराच्या प्रत्येक टप्प्यावर हि प्रणाली लागू करणेत आली असून त्या प्रणालीचे कार्यान्वयन पुढील प्रमाणे होणार आहे.

१) **आवक जावक लिपीक -**

आवक जावक लिपीक यांना क्रमानेच अर्ज भरता येणार आहे.

फेरफार प्रकार निवडण्यापूर्वी कार्यालयात अर्ज प्राप्त दिनांक भरावा.

**परिरक्षण भूमापक -**

एकूण माहिती भरलेले अर्ज या Tab मधील एकूण प्राप्त अर्जाच्या सुरुवातीचे १०% अर्ज फेरफारासाठी निवडता येतील.

उदा. Tab मध्ये एकूण १०० अर्ज असतील तर त्यापैकी १०% म्हणजे पहिले १० अर्जापैकी कोणताही अर्ज निवडता येईल. ११ वा अर्ज निवडता येणार नाही. जसजसे अर्ज निर्गत होतील तसतसे पुढील अर्ज कार्यवाहीसाठी उपलब्ध होत जातील. १०% अर्जांपैकी कोणताही अर्ज ७ दिवसांपेक्षा जास्त दिवस प्रलंबित राहणार नाही, प्रलंबित राहिल्यास पुढील अर्ज कार्यवाहीसाठी उपलब्ध होणार नाही.

वारसांबाबतचे प्रकरणांमध्ये सात दिवसात वारस तपासाची कार्यवाही करणेची आहे. सात दिवसा नंतर सदरचे प्रकरणी परिरक्षण भूमापक यांना कार्यवाही करणे बंधनकारक असेल.

**तृटीपत्र जावक केलेले अर्ज** या Tab मध्ये तृटीपत्र जावक झालेले अर्ज राहतील. केवळ तृटीपत्र तयार केलेले अर्ज हे प्रलंबित अर्जांच्या Tab मध्ये राहतील.

त्रुटीची पूर्तता- आवक जावक यांनी त्रुटी पूर्तता झाल्यानंतर तो अर्ज क्रमानेच भरावा. फेरफार प्रकार नंतर त्रुटीपूर्तता कार्यालयात सादर केल्याचा दिनांक नमूद करावा.

त्रुटी पूर्तता होवून प्रकरण MS यांचे एकूण प्राप्त अर्ज या Tab मध्ये येईल व त्याला वरील प्रमाणे fifo लागू होईल.

निकाली पत्र क्रमानेच निर्गमित करता येतील.

नमूना ९ ची नोटीस क्रमानेच जावक करता येईल.

व अशी प्रकरणे मुदत संपणेवर शिल्लक प्रकरणे या Tab मध्ये जातील.

१५ दिवस पूर्ण झालेले अर्ज हरकत प्राप्त नसलेस क्रमानेच नगर भूमापन अधिकारी यांना मंजुरीस्तव पाठवता येतील.

हरकत प्राप्त झाल्यास - तो अर्ज विवादग्रस्त कडे वर्ग होईल.

**आदेश व मानीव अभिहस्तांतरण -**

आदेशाचे अर्ज हे कोणत्याही क्रमांकावर असतील तरी त्याबाबत कार्यवाही करता येणार आहे. परंतु ही कार्यवाही प्राधान्यक्रमाने करता येणार आहे.

मानीव अभिहस्तांतरणासाठी FIFo लागू राहिल. आदेश व मानीव अभिहस्तांतरण प्रकरणामध्ये क्रमानेच कार्यवाही करता येईल.

आदेश आणि मानीव अभिहस्तांतरणासाठी नमूना ९ चे नोटीसची आवश्यकता नसल्याने तो परिरक्षण भूमापक यांनी फेरफार नोंद घेतल्यानंतर सदर फेरफार नगर भूमापन अधिकारी यांचेकडे मंजुरीस्तव पाठवला जाईल व तो Automatic नगर भूमापन अधिकारी यांचे लॉगीनमध्ये प्रमाणित करण्यासाठी उपलब्ध होईल.

२) **उप अधीक्षक भूमि अभिलेख / नगर भूमापन अधिकारी -**

परिरक्षण भूमापक यांचे प्रमाणेच एकूण प्राप्त अर्जाच्या सुरुवातीचे १०% अर्ज फेरफार मंजूरीसाठी निवडता येतील. तसेच कोणताही अर्ज ७ दिवसापेक्षा जास्त दिवस प्रलंबित राहणार नाही. १०% पैकी एखादा फेरफार प्रमाणित करणेवर प्रलंबित सात दिवसावर प्रलंबित असेल तर पुढील फेरफार बाबत कार्यवाही करता येणार नाही. त्रुटी व निकाली पत्रासाठी आलेले अर्जाबाबत क्रमानेच कार्यवाही करावी.

हरकत प्राप्त प्रकरणे- विवादग्रस्त प्रकरणांमध्ये प्रथम नोटीस क्रमाणेच देता येईल.

वरील प्रणाली कार्यान्वीत झाल्यानंतर कुठलाही अर्ज कुठल्याही स्तरावर प्रलंबित राहणार नाही. याची दक्षता घेण्याची आहे. तसेच यापुढे कुठल्याही प्रकरणांमध्ये क्रम डावलुन कार्यवाही करणेत येवु नये. सदरची प्रणाली ही दिनांक ०१/०८/२०२४ पासून सर्व प्रकारांच्या फेरफारासाठी लागू करणेत येत आहे.

सदर परीपत्रका बाबत उपसंचालक भूमि अभिलेख आणि जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख यांनी आपले अधिनस्त उप अधीक्षक भूमि अभिलेख / नगर भूमापन अधिकारी व परिरक्षण भूमापक व निमतानदार यांचे तात्काळ निंदर्शनास आणुन दयावे.

Signed by
Sachindra Pratap Singh
Date: 22-07-2024 18:13:22
(सचिंद्र प्रताप सिंह)
जमाबंदी आयुक्त आणि संचालक
भूमि अभिलेख (म.राज्य) पुणे.

प्रत :- स्वीय सहायक, जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख (म. राज्य) पुणे यांना माहितीसाठी.

प्रत :- उपसंचालक भूमि अभिलेख संलग्न जमाबंदी आयुक्त (सर्वसाधारण)/(भूमापन)/(ना.भू.)/(एकत्रीकरण) पुणे यांना माहितीस्तव.

प्रत :- उपसंचालक भूमि अभिलेख, पुणे ,मुंबई, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, अमरावती, नागरपूर यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी.

प्रत :- जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, सर्व यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी रवाना.